एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांना पूर्व शालेय शिक्षण अंतर्गत "माझी कृती पुस्तिका" हे पुस्तक पुरवठा करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.५९/का.६
नवीन प्रशासन भवन,३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

<u>वाचा</u> :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. एबाविसेयो/का-६/२५३/२०१५, दिनांक ०४.०२.२०१५
२) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक ७.०२.१९८४ चे परीपत्रक
३) प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगरभवन, मुंबई यांचे दिनांक १८.०४.२०१३ चे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :- सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना ही नवीन योजना २० जिल्हयांसाठी लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रति अंगणवाडी केंद्र प्रत्येक वर्षी रु.२,०००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र प्रत्येक वर्षी रु.१,०००/- इतका निधी पूर्व प्राथमिक शिक्षण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिला जातो. या निधीतून ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांना "माझी कृती पुस्तिका" हे पुस्तक पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या नवीन योजनेतर्गत ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांना मूळ किंमत रु.६५/- त्यावर २०% सूट याप्रमाणे रु.१३/- व सदर पुस्तकाच्या जास्त प्रती खरेदी करावयाच्या असल्याने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई कार्यालयाने मे.अभिषेक टाईपसेटर्स ॲण्ड पब्लिशर्स, पुणे यांचेशी वाटाघाटी करुन सदर पुस्तकाची किंमत आकारणी २/- रु. नी कमी करुन प्रति पुस्तक रु.५०/- प्रमाणे ग्रामीण प्रकल्पातील ७२७६ अंगणवाडी केंद्र व ७४८ मिनी अंगणवाडी केंद्र आणि नागरी प्रकल्पातील ९९७६ अंगणवाडी केंद्रांना प्रति अंगणवाडी केंद्रासाठी १० पुस्तके याप्रमाणे एकूण १,८०,००० नग "माझी कृती पुस्तिका" हे पुस्तक कॉपी राईट धारक मे.अभिषेक टाईपसेटर्स ॲण्ड पब्लिशर्स, पुणे यांच्याकडून खरेदी करुन पुरवठा करण्यासाठी रुपये ९०,००,०००/- (अक्षरी रुपये नव्वद

लाख फक्त) इतका निधी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यास खालील अटींच्या अधिन राहून खालीलप्रमाणे शासन मंजूरी देत आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | वस्तुचे विनिर्देश | पुरवठा करावयाची अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्र संख्या | पुरवठा करावयाचे एकूण नग | दर (प्रतिनग) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | "माझी कृती पुस्तिका (Activity Book)" | तपशिल : आकार :-८"x ११" (४८ पाने) आतील मजकुर - एका रंगात (Black) छपाई ६८ GSM मॅपलिथो कागदावर मुखपृष्ठ : २ पानी, चाररंगी छपाई, १३० GSM आर्ट पेपरवर बाईडिंग : सेंटर पिनिंग पध्दतीचे | अ) ग्रामीण प्रकल्प अंगणवाडी केंद्र ७२७६ (प्रति केंद्र १० नग) | ७२७६० | ५०/- | ३६,३८,०००/- |
| | | | मिनी अंगणवाडी केंद्र ७४८ (प्रति केंद्र १० नग) | ७४८० | ५०/- | ३,७४,०००/- |
| | | एकूण अ) | ८,०२४ | ८०२४० | ----- | ४०,१२,०००/- |
| | | | ब) नागरी प्रकल्प अंगणवाडी केंद्र ९९७६ (प्रति केंद्र १० नग) | ९९७६० | ५०/- | ४९,८८,०००/- |
| | | एकूण अ + ब | १८००० | १,८०,००० | ५०/- | ९०,००,०००/- |

२. "माझी कृती पुस्तिका"हे पुस्तक खरेदी करतांना खालील अटी विचारात घेण्यात याव्यात :-

i) "माझी कृती पुस्तिका" हे पुस्तक [तपशिल : आकार : ८" x ११" (४८ पाने), आतील मजकूर एका रंगात (Black) छपाई ६८ जी.एस.एम. मॅपलिथो कागदावर, मुखपृष्ठ २ पानी, चार रंगी छपाई १३० जी.एस.एम. आर्ट पेपरवर, बाईडिंग सेंटर पिनिंग पध्दतीचे ] या स्वरुपात राहील.

ii) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी वरील "माझी कृती पुस्तिका" हे पुस्तक पुरवठा विहीत नमुन्याप्रमाणे (Sample, specification) असल्याची खात्री करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना सादर करावा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी एकत्रित अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करावा.

iii) खरेदी शासकीय नियमानुसार तसेच विहित अटी व शर्तीप्रमाणे राहील. विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन या वस्तूंचा दर निश्चित करण्यात आला आहे तसेच Copy Right च्या अटी व शर्ती तसेच दर व दर्जा याची खात्री आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी करुन घ्यावी.

iv) सदर वस्तूंचा पुरवठा पुरवठाधारकामार्फत प्रकल्पस्तरावर करण्यात यावा. सदर पुरवठा प्रकल्प स्तरापर्यत वेळेवर होईल याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. सदर वस्तूंचा पुरवठा प्रकल्पस्तरापर्यंत झाल्याची पोच मिळाल्यानंतरच देयके अदा करण्यात यावीत.

v) सदर वस्तूंचे खरेदी, वाटप, पुरवठा व विनियोगामध्ये काही अनियमितता झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

vi) वरीलप्रमाणे "माझी कृती पुस्तिका" हे पुस्तक पुरवठा झाल्यानंतर त्याचा वापर अंगणवाडी केंद्रातील लाभार्थी नियमीतपणे करतील याची योग्य ती काळजी घेण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत पूर्व शालेय शिक्षण या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**अ) ग्रामीण क्षेत्र :-**

**१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - रु.२७,१०,८००/-** लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १५९८) ३१ सहाय्यक अनुदान

**२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - रु.३,०१,२००/-** लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्क.त योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६०४) ३१ सहाय्यक अनुदान

**ब) नागरी क्षेत्र :-**

**१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - रु.४४,८९,२००/-** लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (नागरी) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १६१३) ३१ सहाय्यक अनुदान

**२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - रु.४,९८,८००/-** लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत

योजना, (०४) (१४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (नागरी) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६२२) ३१ सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखालील सन २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठीच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ १११/व्यय-६, दिनांक ३०.०१.२०१५ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का.६, दिनांक ११.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
सहायक संचालक, (वित्त व लेखा) एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मे.अभिषेक टाईपसेटर्स ॲण्ड पब्लिशर्स, पुणे
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४
निवड नस्ती (कार्यासन ६)

निर्गमित
दिनांक 23/02/2015